

आनंद सागर मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस * गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927



* वर्ष ६४ वे * अंक २६ * नांदेड * मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# मुख्यमंत्र्यांना भेटून निर्णय घेणार

## अजितदादा पवार यांचे दमानिया यांना आश्वासन

**मुंबई (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान अंजली दमानिया यांनी संतोष देशमुख हत्येप्रकरणी तुरुंगात असलेला वाल्मिक कराडविरोधात अनेक पुरावे दिले. यानंतर या भेटीवेळी अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. या भेटीनंतर त्यांनी लवकरच याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करेन असे आश्वासन अजित पवारांनी अंजली दमानिया यांना दिले.



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यात वातावरण ढवळून निघालं आहे. या प्रकरणी आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर मकोकाअंतर्गत कारवाई केली जात आहे. याच प्रकरणी आरोपी असलेल्या वाल्मिक कराडवरही मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी वाल्मिक कराडची तब्येत बिघडल्यानं त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावरील दोन दिवस उपचार सुरु होते. या उपचारावर अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

यानंतर अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे भेटीसाठी वेळ मागितली होती. अखेर सोमवारी संध्याकाळी अंजली दमानिया आणि अजित पवारांची भेट झाली. या भेटीनंतर अंजली दमानिया यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अजित पवारांसोबत काय चर्चा झाली, याबद्दलची सविस्तर माहिती दिली.

मी २५ ते ३० मिनिटे त्यांना भेटली. हे माणुसकीला काळिमा फासण्याचे कृत्य आहे, असे त्यांनी मला सांगितले. मग त्यावर मी त्यांना तुम्ही राजीनामा का घेत नाहीत, असे विचारले. मी त्यांना सर्व पुरावे दिले. आज मी त्यांना धनंजय मुंडे, राजश्री मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे एकत्र बिझनेस कसे आहेत? त्यांच्या कंपनीत आर्थिक नफा कसा मिळतो? ऑफिस ऑफ प्रॉपर्टीमध्ये हे सर्व कसं बसतंय? त्यामुळेच तुम्ही कोणत्याही परिस्थितीत तुम्ही राजीनामा घ्यायला हवा याबद्दलचे सर्व पुरावे दिले, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

वाल्मिक कराडचे समर्थक हे दहशतवादी आहेत. त्यांनी बीडमध्ये मोठ्या प्रमाणात दहशत पसरवली आहे. त्याचे सर्व फोटो, रिल्स मी त्यांना दाखवले. त्यांनी ते सर्व शांतपणे पाहिलं. त्यांनी मला असं सांगितलंय की उद्या दुपारी १२ वाजता त्यांची आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मीटिंग आहे. त्यावेळी आम्ही तुम्ही दिलेल्या या सर्वच्या सर्व कागदपत्रांवर चर्चा करु. मुख्यमंत्र्यांशी याबद्दल चर्चा केल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ, असे अंजली दमानियांनी म्हटले.

# दोन दिवस राज्यात जोरदार पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यासह देशात थंडीचा कडाका चांगलाच वाढला होता, मात्र आता पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. देशातील अनेक भागांमध्ये किमान तापमानात वाढ झाली असून, थंडी कमी झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

आयएमडीने दिलेल्या इशाऱ्यानुसार ३० एप्रिल ते २ फेब्रुवारीदरम्यान काही राज्यांमध्ये जोरदार पाऊस पडू शकतो, तर काही राज्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार पश्चिमी विक्षोभामुळे जम्मू- काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये जोरदार पावसासह बर्फवृष्टीची देखील शक्यता आहे. दोन फेब्रुवारीपर्यंत ही स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून उत्तर भारतात देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे, पंजाब, हरियाणा, चंडीगढ, दिल्ली एनसीआर आणि उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी ३० जानेवारी ते एक फेब्रुवारीदरम्यान मेघगर्जनेसह आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान विभागाकडून देशाच्या अनेक भागात पावसाचा इशारा देण्यात आला आहे, मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असं म्हटलं आहे. सोबतच काही भागांमध्ये बर्फवृष्टीचा देखील इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे आता विजा, पाऊस, आणि बर्फवृष्टी असं तिहेरी संकट देशावर असणार आहे.

# जरांगेंची प्रकृती खालावली; बोलताही येईना, धनंजय देशमुखांकडून सरकारला अल्टिमेटम

**बीड (प्रतिनिधी)–** मनोज जरांगेंची प्रकृती खूप खालावत आहे. त्यांना बळ द्यावा. सरकारने लवकरात लवकर त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात आणि मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी मी विनंती करतो. सरकारने गांभीर्यपूर्वक याची दखल घेतली पाहिजे. उद्याच्या उद्या शिष्टमंडळाने येऊन या ठिकाणी भेट दिली पाहिजे. त्यांच्या मागण्या योग्य आहेत. त्यामुळे सरकारने त्या मान्य कराव्यात, असे धनंजय देशमुख म्हणाले. धनंजय देशमुख हे नुकतंच अंतरवाली सराटी गावात दाखल झाले आहेत. त्यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी प्रसारमाध्यमांशी चर्चा केली.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी शनिवारी २५ जानेवारी २०२५ पासून पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसलं आहे. मनोज जरांगे हे सातव्यांदा उपोषणासाठी बसले आहेत. त्यांनी अंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले आहे. सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, 'सगे सोयरे' अंमलबजावणी तातडीने करा, शिंदे समितीला तातडीने मुदतवाढ द्या, कक्ष सुरू करा, वंशावळ समिती गठीत करा, शिंदे समिती मनुष्यबळ वाढवा, संख्याबळ द्या, नोंदी सापडलेल्या लोकांना प्रमाणपत्र द्या, अशा मागण्या त्यांनी सरकारपुढे ठेवल्या आहेत. त्यातच आता बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणात सहभागी होणार आहेत.

धनंजय देशमुख हे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणात सहभागी झाले आहेत. धनंजय देशमुखांसोबत मस्साजोगचे ग्रामस्थही अंतरवाली सराटीत दाखल झाले. धनंजय देशमुख दाखल होताच मनोज जरांगे पाटील हे उठून बसले. मात्र त्यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना बोलता येत नाही.

दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी काही तासांपूर्वी सर्व कार्यकर्त्यांना भावानिक आवाहन केले आहे. उपोषणाला बसणाऱ्यांनी उपोषण सोडावे. सर्वांनी या ठिकाणी बसून मला साथ द्या. उपोषणामुळे शरीराची चाळणी होते. माझे शरीर खराब झाले, तुमचे होऊ देऊ नका, असे भावनिक आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

# राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे आज नांदेडमध्ये

## जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे आज मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी नांदेड येथे येत आहेत. दुपारी ३ वा. त्या विविध विभागाचा आढावा घेणार आहेत.



नांदेड येथे त्यांचे प्रथम आगमन असून आज विविध विभागाचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे बैठकीमध्ये घेणार आहेत.

# भारत आणि इंग्लंडमध्ये आज तिसरा टी-२० सामना

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी-२० मालिका आता निर्णायक वळणावर आली आहे. टी-२० मालिकेतील पहिले दोन सामने जिंकून भारताने इंग्लंडवर दबाव टाकला आहे. आज या मालिकेतील तिसरा सामना आहे.

इंग्लंडने तिसरा टी२० सामना गमावला तर मालिका गमवून बसेल. यासाठी तिसऱ्या सामना काहीही करून जिंकण्याची इंग्लंडची धडपड आहे. खरं तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने चांगली कामगिरी केली होती. मात्र तिलक वर्माने त्यांच्या तोंडातून विजयाचा घास खेचून घेतला. त्यामुळे पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-० अशी स्थिती झाली. याचा फायदा टीम इंडियाला झाला आहे. कारण उर्वरित तीन सामन्यांपैकी एका सामन्यात विजय मिळवला की मालिका भारताच्या खिशात जाणार आहे. तिसरा टी-२० सामना २८ जानेवारीला राजकोटमध्ये खेळला जाणार आहे. असं असताना इंग्लंडने या सामन्यापूर्वी प्लेइंग इलेव्हनची घोषणा केली आहे. पण यावेळेस इंग्लंडने प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केलेला नाही. दुसऱ्या सामन्यात खेळलेला संघच पुन्हा मैदानात उतरणार आहे.

# चिकन, अंडी खाणे शंभर टक्के सुरक्षित नांदेडमध्ये बर्ड फ्लूची लागण नाही

- कोणत्याही अफवांना बळी पडू नका
- पशुसंवर्धन विभागाचे नागरिकांना आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** बर्डफ्लू आजारासंदर्भात नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये. उकळलेली अंडी व शिजवलेले चिकन खाणे मानवी आरोग्यास पूर्णपणे सुरक्षित आहे. जिल्ह्यामध्ये बर्ड फ्लूची लागण झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात समाज माध्यमांवर फिरणारे संदेश व काही माध्यमातून आलेल्या चुकीच्या बातम्यांना बळी पडू नका. चिकन, अंडी खाणे शंभर टक्के सुरक्षित असल्याचा खुलासा पशुसंवर्धन विभागाने केला आहे.

यासंदर्भात सोमवारी एक चित्रफित पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी जारी केली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत या आजारा संदर्भात अतिशय काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील केवळ किवळा या एका गावामध्ये काही पक्षांमध्ये बर्डफ्लू सदृश्य लक्षणे आढळून आली आहेत. या ठिकाणी तातडीने आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र जिल्ह्यात अन्यत्र कुठेही बर्डफ्लूची लागण नाही, असा खुलासा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी केला आहे.

किवळा या गावी साधारणता २० तारखेच्या आसपास एका पशुपालकाच्या कुक्कुट पक्षांमध्ये मृत पक्षी आढळून आल्याने त्याचे नमुने राज्य व राष्ट्रीयस्तरीय प्रयोग शाळेत निदानासाठी पाठविले होते. या प्रयोगशाळेतील बर्डफ्लूसाठीचे नमुने पॉझिटिव्ह दिसून आल्यानंतर या गावामधील १ किमी परिघाच्या क्षेत्रातील सर्व कुक्कुट पक्षी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट केले आहेत. त्यामध्ये साधारणपणे ३८२ मोठे पक्षी आणि ७४ छोटे पक्षी असे एकूण ४५६ पक्षी नष्ट केले आहेत. त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली आहे.

त्याचबरोबर संसर्ग झालेल्या १ किमी क्षेत्राबाहेरील बाधित क्षेत्राच्या १० किमी अंतरापर्यंत आपण सर्तकता क्षेत्र घोषित केले आहे. त्या क्षेत्रातील जितके कुक्कुट पक्षी आहेत त्याचे नमुने दर १५ दिवसाला पुढील ३ महिन्यांपर्यंत प्रयोगशाळेकडे पाठवून त्याचे निदान केले जाणार आहे. त्या पक्षांमध्ये जर आपल्याला परत लक्षणे आढळून आली तर त्यावरही प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाणार आहे.

साधारणपणे बर्डफ्लू हा रोग २००६ पासून राज्यात दिसून आला आहे. तेंव्हापासून एक आदर्श कृती प्रतिसाद धोरण पशुसंवर्धन विभागाने हाती घेतले आहे. याअंतर्गत नियमितपणे आजारी व निरोगी कुक्कुट पक्षाचे नमुने प्रयोग शाळेमध्ये सादर केले जातात. त्यातूनच आपल्याला कुठे जर बर्डफ्लूची लक्षणे दिसून आली तर त्याचे निदान होते. बर्डफ्लू आजार केवळ स्थलांतरण झाले तर पक्षांमध्ये पसरतो. त्यामुळे स्थलांतरण रोखणे त्यावरचा प्रमुख उपाय असतो. जिथे हा रोग आढळून येतो तिथले कुक्कुट पालन ३ महिन्यासाठी थांबविण्यात येते. त्यामुळे या रोगाचा प्रसार निश्चितपणे थांबवता येते. नागरिकांनी यासंदर्भात निर्धास्त असावे. आपण खात असलेले चिकन, अंडी हे शंभर टक्के सुरक्षित आहेत, याचीही खात्री प्रत्येक नागरिकांनी बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले.

# राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यांना आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे आज नांदेडमध्ये येत असून उद्या विविध विभागाचा आढावा ते घेणार आहेत.

उद्या सकाळी त्यांचे नऊ वाजता मुंबईवरून आगमन होणार असून त्यानंतर सकाळी ११.३० वाजता अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांच्याकडे ते आढावा घेणार आहेत.

त्यानंतर दुपारी बारा वाजता शिक्षणाधिकारी प्राथमिक व प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत शालेय पोषण आहार संदर्भात आढावा घेणार आहेत. त्यानंतर जिल्हा कार्यक्रमाधिकारी व प्रकल्प अधिकारी तसेच विविध योजनेचे पुरवठादारासोबत चर्चा करणार आहेत.सोबतच उद्या ते विविध शासकीय गोदामांची पाहणी सुद्धा करणार आहेत.

# वक्फ बोर्ड विधेयकासंदर्भातल्या बैठकीत सत्ताधाऱ्यांच्या १२ सुधारणा मंजूर, विरोधकांच्या सर्व सुधारणा फेटाळल्या!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** प्रस्तावित वक्फ बोर्ड विधेयकावर सखोल चर्चा करण्यासाठी ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आलं. यावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. या वादानंतर बैठकीत समितिचे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांच्यावर हुकुम शाही कारभार करत असल्याचा आरोप विरोधी खासदारांकडून करण्यात आला. यावर गोंधळ घालणाऱ्या १० खासदारांना दिवसभरासाठी निलंबितही करण्यात आलं. यानंतर सोमवारी झालेल्या संयुक्त समितीच्या बैठकीत या विधेयकासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या असून विरोधी खासदारांनी मांडलेल्या ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक २०२४ नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडण्यात आलं. हे विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे सविस्तर चर्चे साठी पाठवण्यात आलं. यासंदर्भात समितीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत १२ सुधारणा मंजूर करण्यात आल्या तर ४४ सुधारणा फेटाळण्यात आल्या. मंजूर करण्यात आलेल्या १२ सुधारणा या सत्ताधारी भाजपा आणि एनडीए आघाडीतील इतर मित्रपक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या. तर फेटाळण्यात आलेल्या ४४ सुधारणा या विरोधी पक्षांकडून मांडण्यात आल्या होत्या. सोमवारी या विधेयकात ज्या सुधारणा मंजूर करण्यात आल्या, त्यामुळे हे विधेयक अधिक चांगलं होऊ शकेल. यातून गरीब व पसमंदा मुस्लिमांना अधिकाधिक फायदा मिळवून देण्याचा सरकारचा हेतू साध्य होईल, अशी प्रतिक्रिया बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष जगदम्बिका पाल यांनी दिली आहे.

# मोक्कामधील तेरा वर्षांपासून फरार असलेला आरोपी परभणी येथून अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या दप्तरी संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल असलेला अट्टल गुन्हेगार मागील तेरा वर्षापासून आपले नाव बदलून फरार होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी भोसले याला परभणी येथून अटक केली आहे.

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी पोलीस ठाण्यात सन २०११ च्या जानेवारीमध्ये आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी उर्फ पिंटू उर्फ बालाजी रामा उर्फ रामजी भोसले (वय ३९) रा. पिंपळगाव ता. लोहा सध्या रा. इंदिरानगर लोहा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच्याविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात संघटित गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार होता.

जिल्ह्यातील फरार आणि पाहिजे असलेल्या आरोपींच्या मुसक्या आवळण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आपल्या अधिनस्त यंत्रणेला दिल्या. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकांना आदेश दिले. सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांच्या सहकाऱ्यांना फरार आरोपींची गोपनीय माहिती काढून त्यांच्या मुसक्या आवळण्याचे आदेश दिल्यावरून लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गुंडेराव करले, स्थागुशाचे अंमलदार देवा चव्हाण, तानाजी शेळके, मोतीराम पवार, राजू बोदगिरे, इसराइल शेख, अनिल बिरादार, साहेबराव कदम, मिलिंद नरबाग यांच्यासोबतच सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे आणि पोलीस उपनिरीक्षक बळीराम दासरे यांना सोबत घेऊन गोपनीय माहिती काढली. आरोपी छत्रपती उर्फ शिवाजी भोसले हा परभणी परिसरात नाव बदलून व बदललेल्या नावाचे नवीन आधार कार्ड तयार करून वास्तव्य करत असल्याची अधिकृत माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनी परभणी जिल्ह्यात जाऊन त्याला पूर्णा तालुक्याच्या हद्दीतून ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने कुंडलवाडी पोलीस ठाण्यात माझ्याविरुद्ध मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर मी फरार होतो अशी कबुली दिली. स्थानिक गुन्हे शाखेने पकडलेल्या फरार आरोपीला कुंडलवाडी पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# काम होईपर्यंत निष्ठा, काम झाले की हळूच निसटा; अशोकरावांची टोलेबाजी

## कै. दिगंबरराव देवडे पुतळ्याचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** सध्याच्या राजकीय परिस्थितीत अनेक कार्यकर्ते कमालीचे अविश्वसनीय झाले आहेत. कारण काम होईपर्यंत निष्ठा अन् एकदा काम झाले की, हळूच निसटा, अशी राजकीय परिस्थिती कार्यकर्त्यांची झाली असल्याचा उपरोधात्मक टोला खा. अशोकराव चव्हाण यांनी कै. दिगंबरराव देवडे लहानकर यांच्या पुतळा अनावरण प्रसंगी बोलताना लगावला आहे.



लहान येथील कै.दिगंबरराव देवडे लहानकर अर्धाकृती पुतळा अनावरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. ॲड. श्रीजयाताई चव्हाण, कृऊबाचे सभापती संजय लहानकर, माजी सभापती किशोर स्वामी, माजी सभापती शामराव पाटील, माजी सरपंच सुधाकर इंगळे, बालासाहेब देशमुख, संचालक गोविंदराव शिंदे, श्रीमती सविता गायकवाड, माजी उपाध्यक्ष गंगाधर पाटील, नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी तालुकाध्यक्ष बालाजीराव गव्हाणे, सरपंच सदाशिव इंगळे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, संचालक निळकंठराव मदने, गटनेते बाबुराव लंगडे, आनंदराव भंडारे, सरपंच अमोल डोंगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शंकर बाप्पा स्वामी, हभप रामराव महाराज पांगरेकर, विलास स्वामी यांच्या हस्ते कै. दिगंबरराव देवडे यांच्या पुतळ्याचे पूजन करून खा. अशोकराव चव्हाण यांनी अनावरण केले. नंतर हभप राम महाराज पांगरेकर यांचे कीर्तन झाले.

यावेळी बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, कै. दिगंबरराव देवडे हे केंद्रीय गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्याशी एकनिष्ठ होते. त्यांची तिसरी पिढी सुध्दा चव्हाण घराण्याशी एकनिष्ठ आहे. विजय देवडे यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असून, त्यांनी कुंभार समाजासाठी सांगितलेली कामे पूर्ण करण्याचे आश्वासन खा. चव्हाण यांनी दिले.

याप्रसंगी बोलताना आ. ॲड. श्रीजयाताई चव्हाण म्हणाल्या की, लहानकरांनी विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे. तसेच आगामी काळात विकासा-बरोबर शिक्षण क्षेत्रात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे राहू नये यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी स्पर्धेत टिकावे यासाठी प्रयत्न करणार आहे. तर लवकरच आपल्या भागातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्यासाठी कंपन्यांचे रोजगार मेळावे घेऊ, असे वक्तव्य केले

यावेळी कृऊबाचे सभापती संजय लहानकर, पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गंगा माता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय देवडे यांनी केले तर सूत्रसंचालन बाळासाहेब देवडे तसेच आभार सचिव आदित्य देवडे यांनी मानले. यावेळी सरपंच अमोल डोंगरे, माजी सरपंच एल. बी. रणखांब, पोलीस पाटील छगनराव इंगळे, विजय भुस्से, गणेशराव राठोड, राजेश कल्याणकर, राजू लोणे, मंगेश कुऱ्हाडे, चंद्रमुनी लोणे, व्यंकटी राऊत आदींसह अनेकजण उपस्थित होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# राजकीय रणधुमाळी

नवीन वर्षातील पहिला महिना संपत आला असला तरी जुन्या समस्यांसोबत नवीन समस्या देखील आपल्या देशात आकाराला येत आहेत. चीनची कुरघोडी आताही थांबलेली नाही. विदेशी आणि आंतरदेशीय अनेक प्रकारच्या समस्या २०२५ मध्ये उग्ररूप धारण करण्याची शक्यता आहे. म्हणूनच हे वर्ष सुद्धा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि त्यांच्या शासनासाठी परीक्षेचा काळ ठरणार आहे. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर भारताचा राजकीय पट तुलनेने शांत दिसत असला तरी, या शांततेला अनेक कंगोरे दिसत आहेत. २०२५ हे वर्षे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरणार असून, अनेक निवडणुका, धोरणात्मक निर्णय, आणि सामाजिक प्रश्न यामुळे राजकारणाचा पट अधिक गोंधळलेला होण्याची शक्यता आहे. पुढच्या महिन्यात होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. दिल्लीतील सत्ताधारी आम आदमी पार्टीसाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई असेल, तर भाजप आणि काँग्रेससाठी ती पुनरुत्थानाची संधी ठरेल. या निवडणुकीतून राष्ट्रीय राजकारणाचे नवे संकेत मिळू शकतात, कारण दिल्लीतील राजकीय वारे देशातील इतर भागांवरही प्रभाव टाकतात. राज्यातील २९ महापालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, आणि २८९ पंचायत समित्या सध्या प्रशासकांच्या अधीन आहेत. या संस्थांच्या निवडणुका अनेक कारणांनी लांबल्या आहेत. ओबीसी आरक्षण, प्रभाग रचना, आणि कोरोना महामारी यामुळे. २०२५ मध्ये या निवडणुकांचा मुहूर्त लागण्याची शक्यता आहे. विशेषतः मुंबई महापालिका निवडणूक राष्ट्रीय स्तरावरही लक्षवेधी असेल, कारण ती केवळ स्थानिक राजकारणाचाच नव्हे तर पक्षीय ताकदीचा आरसाही आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारला काही ठोस पावले उचलावी लागतील. प्रलंबित निवडणुकांसाठी प्रभाग रचना, मतदार याद्या अद्ययावत करणे, आणि आरक्षण निश्चिती या प्रक्रियेसाठी आणखी वेळ लागेल. त्यामुळे २०२५ च्या पहिल्या सहामाहीत निवडणुका होण्याची शक्यता आहे. २०११ नंतर पहिल्यांदाच होणारी जनगणना देशाच्या सामाजिक आणि आर्थिक संरचनेवर परिणाम करणारी ठरेल. जातीआधारित जनगणनेचा मुद्दा केंद्रस्थानी असेल, ज्यामुळे ओबीसी, दलित, आदिवासी यांसारख्या गटांच्या स्थितीवर प्रकाश पडेल. यामुळे आरक्षण धोरण आणि संसाधनांचे वाटप अधिक प्रभावी होऊ शकते. मात्र, या प्रक्रियेवर विरोधक सरकारवर जातीय तणाव वाढवण्याचे आरोप करत आहेत. २०२५ मध्ये होणारी लोकसभेची सीमांकन प्रक्रिया राजकीय दृष्टिकोनातून निर्णायक ठरेल. लोकसंख्येच्या आधारे खासदारांच्या जागांचे पुनर्विभाजन होईल. विशेषतः दक्षिण भारत आणि उत्तर भारतातील जागांच्या तुलनेत मोठा बदल अपेक्षित आहे, ज्यामुळे क्षेत्रीय आणि जातीय समीकरणांवर दूरगामी परिणाम होईल. राजकीय संघर्षांच्या पलीकडे, भारताला पाणीटंचाई, पर्यावरण संवर्धन, महिला सुरक्षेसाठी उपाय, आणि शिक्षण–आरोग्याच्या सुधारणा यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल. राजकीय नेतृत्वाने हे प्रश्न प्राधान्याने सोडवले तरच लोकशाहीची सुदृढता सिद्ध होईल. २०२५ हे वर्ष केवळ निवडणुकांचे नाही, तर भारतीय लोकशाहीची कसोटी पाहणारे असेल. स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील संघर्ष, नव्या धोरणांचे अंमल, आणि सामाजिक प्रतिनिधित्वाचे प्रश्न यांमुळे हे वर्ष घडवणारे ठरेल. भारतीय लोकशाहीच्या मजबूततेचे खरे परीक्षण अशा काळातच होते, जेव्हा राजकीय रणधुमाळीतून देशाला दिशा देण्याची क्षमता दाखवावी लागते. २०२५ हे वर्षे नव्या आशा, नवी आव्हाने, आणि नव्या सुरूवातींचे असेल, ज्यात भारताचा राजकीय पट एका नव्या टप्प्यावर पोहोचेल.

# पंजाब केसरी लाला लजपत राय!



लाला लजपत राय हे भारतीय लेखक आणि राजकीय नेता होते. हे पंजाबी, भारतीय राजकारणी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी योगदान दिले. ते जहाल मतवादी नेते होते. त्यांना पंजाब केसरी असे म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली. लाला लजपतराय, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल या त्रयींना लाल–बाल–पाल म्हणतात.

लाल–लाला लजपतराय यांचा जन्म दि. २८ जानेवारी १८३६ रोजी धुंढिके, पंजाब, ब्रिटिश भारतात झाला. वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. सन १८४९ मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला. सन १८७० च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले. सुरुवातीच्या आयुष्यात लजपतराय यांचे उदारमत–वादी विचार आणि हिंदुत्वावरील त्यांचा विश्वास त्यांचे वडील आणि अतिशय धार्मिक आई यांच्यामुळे तयार झाला. सन १८८० मध्ये लजपतरायांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथेच ते देशभक्त आणि भविष्यातील स्वातंत्र्यसैनिक लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त यांच्या संपर्कात आले. लाहोरमध्ये शिकत असताना स्वामी दयानंद सरस्वतींच्या हिंदू सुधारणा चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते आर्य समाजाचे सदस्य बनले. तसेच लाहोर स्थित आर्य गॅझेटचे संस्थापक, संपादक बनले. हिंदुत्वावरील वाढत्या विश्वासामुळे ते हिंदू महासभेत सामील झाले. त्यामुळे त्यांना नौजवान भारत सभेच्या टीकेला सामोरे जावे लागले. कारण ही महासभा धर्मनिरपेक्ष नव्हती. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे पुढे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या यशस्वी आंदोलनासाठी त्यांनी शांततामय मार्गाने चळवळी केल्या. सन १८८४ मध्ये त्यांच्या वडलांची बदली रोहतक येथे झाली आणि लाहोर येथील अभ्यास संपवून लजपतरायसुद्धा त्यांच्या बरोबर आले. सन १८८६ मध्ये ते वडिलांच्या बदलीबरोबर हिसारला आले आणि तेथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. बाबू चूडामणींसह लजपतराय हिसारच्या बार कौन्सिलचे संस्थापकच सदस्य बनले. लाला लजपतरायांनी लिहिलेली पुस्तके–यंग इंडिया, द कलेक्टेड वर्क्स ऑफ लाला लजपत राय; संपादक: बी. आर. नंदा, लाला लजपत राय रायटिंग अँन्ड स्पीचेस, मॅझिनी, गॅरिबाल्डी, शिवाजी महाराज यांची उर्दू भाषेत लिहिलेली संक्षिप्त चरित्रे, श्रीकृष्ण आणि त्याची शिकवण, महान अशोक आदी आहेत.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चूडामणी, चंदूलाल तयाल, हरीलाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ.रामजीलाल हुडा, डॉ. धनीराम, आर्य–समाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची सन १८८८ आणि १८८९ मध्ये निवड झाली. सन १८९२ मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आणि भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारिता सुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले. सन १८८६ मध्ये त्यांनी महात्मा हंसराज यांना लाहोरमध्ये दयानंद अंग्लो–वैदिक स्कूलची स्थापना करण्यास मदत केली. भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीनंतर लाहोरमधील या विद्यालयाचे रूपांतर इस्लामिया कॉलेजमध्ये झाले. सन १९१४ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात योगदान देण्यासाठी लजपतरायांनी वकिलीला रामराम ठोकला. सन १९१४ मध्ये ते ब्रिटनला गेले आणि नंतर सन १९१७ मध्ये अमेरिकेला गेले. ऑक्टोबर १९१७ मध्ये त्यांनी न्यू यॉर्कमध्ये भारतीय होमरूल लीगची स्थापना केली. ते सन १९२७ ते १९३० पर्यंत अमेरिकेत होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी झाल्यानंतर आणि पंजाबमधील राजकीय निदर्शनामध्ये भाग घेतल्यानंतर मे १९०७ मध्ये कोणताही खटला न चालवता लाला लजपतरायांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. पण त्यांना अटक करून ठेवण्यासाठी पुरेसा पुरावा नाही, असे लॉर्ड मिंटो यांनी ठरवल्याने नोव्हेंबरमध्ये त्यांना परत जाण्याची परवानगी देण्यात आली. सन १९२० साली कोलकाता येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खास अधिवेशनात ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. सन १९२१ मध्ये त्यांनी लाहोरमध्ये लोकसेवक मंडळ या ना नफा, ना तोटा तत्त्वावरील कल्याणकारी संघटनेची स्थापना केली. फाळणीनंतर या संस्थेचे कार्यालय दिल्ली येथे हलवण्यात आले. भारतभरात या संस्थेच्या अनेक शाखा आहेत. सन १९२८ मध्ये भारतातील राजकीय परिस्थितीबद्दल अहवाल देण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश सरकारने एका आयोगाची स्थापना केली. भार–ता–तील राजकीय पक्षांनी या आयोगावर बहिष्कार घातला, कारण या आयोगाच्या सदस्यांमध्ये एकही भारतीयाचा समावेश नव्हता. या आयोगाविरुद्ध भारतभर निदर्शने झाली. दि. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी जेव्हा या आयोगाने लाहोरला भेट दिली, तेव्हा त्याविरुद्ध मूक निदर्शनांचे नेतृत्व लाला लजपत रायांनी केले. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट यांनी या निदर्शकांवर लाठी हल्ला करण्याचे आदेश दिले. जखमी होऊनसुद्धा लाला लजपतरायांनी या जमावासमोर भाषण केले. आज मी ज्या लाठ्या खाल्ल्या, त्या म्हणजे ब्रिटिश सरकारच्या भारतातील राजवटीच्या शवपेटिकेवरील शेवटचे खिळे ठरतील, असे मी जाहीर करतो. हे त्यांचे यावेळचे उद्गार होते.

निदर्शनांच्या वेळेला झालेल्या लाठी हल्ल्यातून लाला लजपतराय पूर्णपणे बरे झाले नाहीत आणि हृदय विकाराच्या धक्क्याने दि. १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. स्कॉटच्या लाठीमारामुळेच लालाजींना मृत्यू ओढवला, असे डॉक्टरांचे म्हणणे होते. पण जेव्हा हा मुद्दा ब्रिटनच्या संसदेत उपस्थित करण्यात आला तेव्हा, यात आपली काहीही भूमिका नव्हती, असे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. या घटनेचा सूड घेण्याचे क्रांतिवीर भगतसिंग यांनी ठरवले. पण ऐनवेळी स्कॉटला ओळखण्यात चूक झाल्यामुळे भगतसिंगांना सॉन्डर्स या सहाय्यक पो–लीस अधीक्षकावर गोळ्या झाडण्याचा इशारा करण्यात आला. त्याच दिवशी लाहोरमधील जिल्हा पोलीस मुख्यालयातून बाहेर पडणाऱ्या सॉन्डर्सवर राजगुरू आणि भगतसिंग यांनी गोळ्या झाडल्या. या दोघांचा पाठलाग करणारा चननसिंग नावाचा हेड कॉन्स्टेबल चंद्रशेखर आझाद यांनी केलेल्या गोळीबारात जखमी झाला. लाला जलपयतराव यांच्या जयंतीनिमित्त लाला लजपत राय यांना कोटी कोटी विनम्र अभिवादन!

**–श्रीकृष्णदास निरंकारी**
गडचिरोली.
मो. ७१३२७९६६८३

# ज्ञानदान केवळ सेवाव्रत नव्हे, अखंड साधना



आजच्या बदलत्या,धावत्या आणि पूर्णत: प्रत्येक पेशाकडे व्यवसाय म्हणून पहाणारे व त्याला व्यवसायिक स्वरुप देणारे आणि त्यातून अधिकाधिक अर्थप्राप्ती करुन स्वत:ला धन्य समजणारे अनेक व्यवसायवीर आपण पहातो. आपला शिक्षकी पेशाही त्याला अपवाद नाही.काही आपल्या बांधवाचे तर शाळा,महाविद्यालयात गेल्यावर त्यांच्या विचार व वाणीवैभवात व्यवसायचक्रच वेगवान झालेले आपल्याला दिसते.आपल्या पेशाला गौण स्थान देवून इतर सर्व प्रकारचे व्यवसाय कसे महत्वाचे,हे आपल्या सहकाऱ्यांना पटवून देण्यात व्यस्त झा–लेले अनेक शिक्षक बांधव मी पाहिले आहेत.मग शेअर मार्केट,वेगवेगळ्या स्कीम,प्लॉटींग,त्यांच्या मालकीची शेती किंवा बटईने, ठोक्याने शेती घेवून ती करण्यातले फायदे,व्याजाने पैसे देण्याचे किंवा घेण्याचे फायदे, यावर मनमुराद चर्चा करणारे माझे अनेक अष्टपैलू शिक्षक बांधव पाहून मी अनेकदा भारावून गेलो. त्यांच्यातील क्षमतेला,बुद्धीमत्तेला व कार्याला वंदन करण्यासाठी त्यांच्यासमोर नतमस्तक होण्याचा मोह मला अनेक वेळा झाला.

असे असले तरी माझ्या आदर्शातील शिक्षक मात्र ते होवू शकत नव्हते. शैक्षणिक समस्येवरील माझा प्रकाशित झालेला एक लेख वाचून साधारणपणे तीन वर्षापूर्वी मला एक फोन आला. सर मी तरुण भारत मधील आपला एक लेख वाचला. त्या लेखाचे कात्रण मला लेख प्रदर्शनीत ठेवण्याची परवानगी मिळू शकेल का? वास्तविक पहाता माझ्यासाठी ती आनंदाची आणि अभिमानाची बाब होती. त्यासाठी त्यांनी माझी परवानगी मागण्याची तरी काय गरज होती? हल्ली वाचनसंस्कृतीला लागलेली उतरती कळा, वाचकांची संख्याच झपाट्याने कमी होत असतांना कोणता लेखक परवानगी नाकारणार ? पण या शिष्टाचारातून त्या व्यक्तीमत्वाच्या विनयाची खात्री पटते. लेखकाप्रति त्या व्यक्तीच्या मनी अस–लेला आदरही आपल्या लक्षात येतो.

यादवराव पाटीलबा सुसर ता.जि बुलडाण्यात धाड जवळ असलेले जांब हे सरांचे मूळ गावं. चिखली जि. बुलडाणा येथील आदर्श प्राथमिक विद्यामंदिर येथे साडे चौतिस वर्षाची प्रदीर्घ सेवा देऊन बारा वर्षे होऊन गेले. हल्ली वय फक्त सत्तर वर्षे. सत्तरच्या पाठीमागे फक्त लावण्याचं कारण एवढच की सतरा वर्षाच्या तरुणाकडे सुद्धा जो सळसळता आणि ओसंडून वाहणारा उत्साह सद्य स्थितीत आपल्याला दिसणार नाही.तो सरांच्या चेहऱ्यावर, त्यांच्या विचारात व कार्यात दिसतो. तेजपूंज चेहरा आणि त्यावरील समाधान,आनंद किती म्हणून वर्णावा?सेवाकाळात अध्यापनासाठी समोर असणारी सर्व पिढी सहा ते दहा वर्षाची. त्यांच्यात क्रमित पुस्तकातील ज्ञान देण्यासोबतच देशात आणि जगात घडणाऱ्या किती घडामोडी या चिमुकल्या जीवासमोर मांडू आणि किती नाही? या विचाराने झपाटून गेलेला जीव म्हणजे याद–वराव सुसर गुरुजी. नव्या पिढीत सर्वकष गुणवत्ता निर्माण करण्यासाठी विविध वृत्तपत्रे विकत घेणे. त्यातील त्यांना महत्वाचे वाटणारे लेख,बातम्या यांच्या पेपरकात्रणाचे संकलन करुन त्याची कायम स्वरुप जपणूक व्हावी यासाठी त्यांना लॅमिनेशन कव्हर लावणे,अत्यावश्यक लेखाच्या फाईल्स बनविणे यासाठी आतापर्यंत ऐंशी ते नव्वद हज–ाराचा खर्च करुन हा खर्च व खर्चाबरोबर छंद चालू ठेवणाऱ्या या ध्येयवेड्या जीवाने उगवत्या पीढीसाठी भव्य स्वप्न पाहिली आहेत. त्यामुळेच संधी मिळेल तीथे या पेपरकात्रणाची प्रदर्शनी भरविणे. प्रत्येक शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी ती वाचावी यासाठी आवाहन करणे,आग्रह धरणे.हे किती मोलाचे काम. त्यासाठी आपल्या निवृत्तीचा कालावधी देणे. शेवटच्या श्वासापर्यंत आपल्यातील शिक्षक जींवत असावा यासाठी चाललेली ही सेवा निश्चितच वंदनीय आहे.

दररोज किमान चार वर्तमानपत्र विकत घेवून त्याचे वाचन करणे,त्यातील चांगले विचार व माहितीचे संकलन करुन त्याचे जतन प्रदर्शन त्यातून होणाऱ्या जनसंपर्काबरोबरच लेखक, विचारवंताच्या सहवासात राहणे हा गुरुजींचा आवडता छंद.त्यामुळे घरी येणारे नातेवाईक,मित्र, सहकारी याबरोबरच त्यांच्याकडे कुणी लेखक,वक्ता,विचारी माणूस जर गेला तर गुरुजींचा तो जीव की प्राण. त्यांच्यासाठी वेळ तर द्यायचाच पण त्यांची व्यवस्था एवढी चोख करायची की कितीही व्यस्त असणाऱ्या व्यक्तीला त्यांच्याकडे थांबण्याचा मोह व्हावा.विचार करणाऱ्या व्यक्तीला एक प्रश्न पडतो की या माणसाच्या ' माणूस जोडो अभियानात सौ.वहिणीला किती त्रास होत असेल?सर्व मुले बाहेरगावी त्यामुळे घरात राहण–ारे दोघेच.यांचे वय सत्तर म्हणजे सौ.चे वय चौसष्ट पासष्ट तरी असेल,पण येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांचे एवढे स्वागत,अगत्य की पाहुणा तृप्त होऊन गेला पाहिजे.साक्षात अन्नपूर्णा मातेकडून तृप्त झाल्याचे समाधान अतिथीला मिळाले पाहिजे.याची काळजी घेणारी गृहिणी गुरुजींच्या निवासी वास करित असल्यामुळे त्यांच्यासारखे भाग्यवान स्वत: तेच. निवृत शिक्षकांनी सामाजिक व शैक्षणिक कार्याचे भान ठेवा हे आवाहन आपल्या बांधवांना करत असतांना सुसर गुरुजी म्हणतात.माझ्या चुका दुरुस्त करा,या त्यांच्या नम्रतेत त्यांचे महानत्व दडले आहे. उगवत्या पिढीने दिव्य ध्येयाकडे वाटचाल करावी. असे स्वप्न उराशी बाळगुन या वयात कार्यक्षम होणे. यासाठी सपूर्ण युवा पिढीवर प्रेम करणारा शिक्षक म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. त्यांच्या मते शिक्षण घेतांना वाचनात आलेली एक ओळ मुलांचे भविष्य बदलू शकते.त्यासाठी शिक्षक पालकांनी विद्यार्थ्यांना ग्रंथमित्र बनविले पाहिजे. विद्यार्थी देशाची मानवी संपत्ती असल्यामुळे त्यांना केवळ प्रमाणित करण्याचे काम त्यांचे आयुष्य उद्वस्त करते.युवापिढी घडवितांना राष्ट्रनिर्मिती हा विचार सर्व प्रथम डोळ्यासमोर यावा.

वाचनसंस्कृती शहरी भागासोबत ग्रामिण परिसरात रुजविली गेल्यास मानवतेचा दिप प्रज्वलीत करणे शक्य आहे.त्यामुळे सद्विचार व सकारात्मक कृतिने प्रत्येकाचे जीवन तेजोमय बनविणे शक्य आहे. सतत वाचन, लेखन,मनन, चिंतन,संभाषन,वक्तृत्व व अभिनय स्पर्धेने गुणवत्ता वाढीस लावली पाहिजे. मुलांत गुणवत्ता दृष्टी जर प्राप्त करुन दिली तर ते आपोआप शिकतील.ही देशाची मानवी संपत्ती अधिकाधिक कार्यक्षम कशी होईल? त्याबरोबरच ती देशाला सर्वार्थाने संपन्न कशी बनवेल ? अशा प्रश्नांनी झपाटलेला एक शिक्षक जवळून पाहिल्यामुळे मी तृप्त झालो.

माझ्या आशा आकांक्षा पल्लवित झाल्या. शिक्षणक्षेत्रात आशादायी चित्र निर्माण करण्यासाठी आजही सेवानिवृत झालेले व कार्यरत असलेले काही शिक्षक आहेत.तोपर्यंत आपण काही सकारात्मक आशा,अपेक्षा ठेवायला हरकत नाही.ज्ञानदान केवळ एक सेवाव्रत नव्हे तर अखंडसाधना समजून समर्पित जीवन जगणारे शिक्षक आहेत.समाजाने त्यांचे मनोधैर्य वाढवावे.सकारात्मक कार्य करण्यसठी त्यांना प्रेरणा द्यावी.त्यामुळे त्यांची संख्या वाढेल.ती संख्या वाढावी अशी मनोमन प्रार्थना करु या.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# शाश्वत शेती, शाश्वत ऊर्जेच्या माध्यमातून परिवर्तन घडवू या : पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड(प्रतिनिधी)–** भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचे झेंडावंदन आज राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे झाले. यावेळी त्यांनी नांदेड जिल्ह्याच्या विकासासाठी शाश्वत शेती व शाश्वत ऊर्जेच्या सर्व प्रकल्पांना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचा संदेश यंत्रणांना दिला. आजचा प्रजासत्ताक दिन विविध विभागांचे लक्षवेधी सादरीकरण व चित्ररथांमुळे स्मरणीय ठरला.

आज सकाळी ९.१५ वा. पालकमंत्री अतुल सावे यांनी ध्वजवंदन केले. त्यानंतर पो–लीस वाहनातून त्यांनी संचलन करणाऱ्या पथकांचे निरीक्षण केले. आजच्या परेडचे नेतृत्व पोलीस उपअधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी केले.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खा–सदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद तिडके, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र सैनिक, वारसपत्नी आणि जेष्ठ सन्माननीय नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

आज या कार्यक्रमामध्ये अनेक मान्यवरांना अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपलब्धीसाठी त्यांचा सत्कारही करण्यात आला.

यावेळी पालकमंत्र्यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी केंद्र व राज्य शासनाने शेती आणि अपारंपरिक ऊर्जेच्या स्त्रोतांना शाश्वत सुत्रामध्ये बांधण्याचे धोरण अधोरेखीत केले. जिल्ह्यातील सिंचन सुविधा आणखी बळकट करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले. यावेळी त्यांनी किवळा साठवण तलाव पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणल्यास सिंचन क्षमता आणखी वाढेल. यासाठी तातडीने शहराच्या पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या सूचना केल्या.

भारताला अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रात भरारी घ्यायची आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात जोरदार पावले टाकणे सुरू केली आहेत. दावोसमधील नुकत्याच झालेल्या व्यापारी करारामध्ये मोठे प्रकल्प अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतामध्ये होत असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले. त्यामुळे या क्षेत्रात नांदेड जिल्हा अग्रेसर राहील यासाठी पुढील काळात प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतासोबतच शेतीच्या शाश्वत विकासाची हमी बारमाही सिंचन सुविधांनी वाढविण्यासाठी त्यांनी राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, शेततळे व जलसंधारणाच्या अन्य कामाकडे जिल्ह्यामध्ये पुढील काळात लक्ष दिले जाईल असे सुतवाच केले.

# प्रजासत्ताक दिन : राज्यपालांच्या हस्ते राजभवन येथे ध्वज वंदन



**मुंबई:** देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी महाराष्ट्र राजभवन येथे राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना दिली.

राष्ट्रगीत तसेच राज्यगीत झाल्यानंतर राज्य राखीव पोलीस दल व महाराष्ट्र पोलीस दलातर्फे सलामी देण्यात आली.

राज्यपाल राधाकृष्णन यांनी पत्नी सुमती यांचेसह राजभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच पो–लीस अधिकारी व उपस्थित लहान मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच मिठाई वाटप केले.

## थोडक्यात...

### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– सांगवी येथील क्युरिओसिटी प्री प्रायमरी स्कूलमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर संचालक प्रा. माधव खिल्लारे व संचालिका सौ.आशा खिल्लारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कु. सेजल कुलते व कोरिओग्राफर जाधव यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यानंतर महापुरुषांच्या वेशभूषेत विविध शालेय स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांचा शैक्षणिक कीट बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. यावेळी नितीन पाथरकर, गोविंद गजभारे, गजानन भोपाळे, मीलन जैन, विद्या कसबे, मनीषा जोंधळे, सौ. गायकवाड आदींची उपस्थिती होती.

### उद्या हुतात्मा पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन

**बिलोली (प्रतिनिधी)** – अर्जापुर येथील कै. जयराम आंबेकर विद्यालयात दि. ३० रोजी दुपारी १ वाजता अर्जापुर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गंगाधरराव पटने यांची तर बिलोलीलीच्या उप विभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे. यासोबतच प्रश्न सीमावर्ती भागाचे प्रमुख सम न्वयक गोविंद मुंडकर, प्रा. डॉ गोपाळ चौधरी यांची प्रम ुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी तात्यासाहेब देशमुख यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन मुख्याध्यापक सुभाष देगलूरकर यांनी केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात सर्वत्र स्वच्छतेला प्रारंभ

## शंभर दिवसांच्या सातसूत्री कार्यक्रमांची धडाक्यात अंमलबजावणी



**नांदेड (प्रतिनिधी)** – शंभर दिवसांच्या नियोजनात ७ सुत्री कार्यक्रमांचा अंमल करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्धारित केल्याप्रमाणे नांदेड जिल्हा प्रशासनाने कार्यक्रमाला धडाक्यात सुरुवात केली आहे. त्यानुसार जिल्हा स्थानावरील जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयांची स्वच्छता प्रशासनाने सुरु केली आहे.

२४ व २५ जानेवारीला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी अनेक जिल्हास्तरावरील कार्यालयाला भेट देऊन स्वच्छता मोहिमेचा आढावा घेतला. या मोहिमेमध्ये उपविभागीय अधिकारी तहसीलदार व सर्व विभाग प्रमुख सहभागी झाले आहे.

स्ताएवजीकरण, संगणकीकरण, सात बंडलम ध्ये विभागलेल्या संचिका, लेख्यांची विभागणी, याबाबत प्रत्येक कार्यालय स्वच्छता म ोहीम पाळत आहे.

शंभर दिवसांचे नियोजन करताना दोन दिवसांपूर्वी म हसूल विभागातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी बैठक घेतली. या बैठकीमध्ये त्यांनी ७ सुत्री कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्दे श दिले होते. त्यानंतर शुक्रवार व शनिवारी ही मोहीम मोठ्या प्रमाणात नांदेड मुख्यालयात राबविण्यात आली.

प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमानंतर सर्व कार्यालयात सात सूत्री कार्यक्रमाची अंम लबजावणी होणार आहे. याम ध्ये प्रामुख्याने सर्व विभागांना त्यांच्या वेबसाईट अपडेट करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. नागरिकांची सनद व दर्शनी माहिती अपडेट करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहे. सूचनाफलक व अन्य बाबी अद्यावत करणे, कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यागतांना, लाभार्थ्यांना, तातडीने आवश्यक मदत दिली गेली पाहिजे, अभ्यागतांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली पाहिजे, तक्रार निवारण्याची योग्य पद्धत कार्यालयात अस्तित्वात असली पाहिजे. कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे. जिल्ह्याच्या विकासात, सहभागात, गुंतवणुकीत वाढ होईल अशा पद्धतीची कार्यालयीन व्यवस्था तयार करण्यात यावी, प्रस्तावांचा तात्काळ निपटारा व्हावा, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावी. तसेच अधिकाऱ्यांनी आठवड्यातून दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखीव ठेवावेत असे निर्देश देण्यात आले आहे.

# मुलींच्या उत्कर्षाचा शाश्वत आधार म्हणजे शिक्षण –डॉ. गोविंद नांदेडे



**नांदेड (प्रतिनिधी)**– मुलींच्या उत्कर्षाचा शाश्वत आधार आणि मार्ग म्हणजे शिक्षण होय. परिश्रमाच्या पावलानेच प्रगती चालत घरी येत असते, ज्याला जग जिंकायचे आहे, त्याने या परिश्रमाची कास धरुनच मोठे व्हावे, म्हणजे नोकरीसाठी दारोदार भटकायची गरज पडणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी प्रतिपादन केले आहे.

नांदेड तालुक्यातील नाळेश्वर येथे गावातील विद्यार्थी आणि नवनियुक्त अधिकाऱ्यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. सिने अभिनेते तथा सनदी अधिकारी अनिल उर्फ एकनाथ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली हा गौरव सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक केशव धोंडीबा वाघ उपस्थित होते. महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीप प्रज्वलित करून प्रारंभ करण्यात आला.

गावातील उत्तम शैक्षणिक प्रगती साधलेल्या आणि सर्वो त्तम परीक्षा यशस्वी केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि नवनियुक्त १८ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा त्यांच्या नवीन नोकरीत पदस्थापना झाल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थाचालक रंगनाथराव वाघ यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी नाळेश्वर गावातील विकासात शाळांचे योगदान अत्यंत म हत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. गावातील अनेक मुली एमबीबीएस झाल्याबद्दल त्यांचाही आई वडिलांसह सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषदेचे माजी सभापती नरहरी वाघ यांनी आपल्या भाषणातून

आता नव्या पिढ्यांनी कठोर परिश्रम करण्याची आणि अतूट जिद्दीची तयारी ठेवावी असे प्रतिपादन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून सिने अभिनेते अनिल उर्फ एकनाथ मोरे यांनी ग्रामीण मुलींच्या शिक्षणावर भर दिला. मुलींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पालक आणि शिक्षकांनी अविरत परिश्रम करण्याच्या अवश्यकतेवरही त्यांनी भर दिला. नाळेश्वर गावातून अनेक मुली डॉक्टर झाल्याच्या घटनेचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पंडित पवळे, सहशिक्षक संजय कोठाळे आणि गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक या सुंदर गुण गौरव कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हरी नारायण धोत्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन गजानन बालाजी वाघ यांनी केले.

# उद्या 'स्वारातीम' विद्यापीठाचा २७ वा दीक्षान्त समारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा २७ वा दीक्षान्त समारंभ दि. २९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या दीक्षान्त मंचावर पार पडणार आहे. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष प्रा. भूषण पटवर्धन, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, व्यवस्थापन परिषदचे सर्व सदस्य यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती असणार आहे. असे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी कळविले आहे.

विद्यापीठातून सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यास नांदेड चॅन्सलर सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात येत असते. यावर्षी हा बहुमान परभणी येथील बी रघुनाथ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रद्धा हरहरे यांना मि ळणार आहे. श्रध्दा हरहरे यांना राज्यपाल महोदयांच्या हस्ते सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय इतरही ५१ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देवून सन्मानित करण्यात येणार आहे. सत्ताविसाव्या दीक्षान्त समारंभानिमित्त विद्यापीठ परीक्षेत्रातील चारही जिल्ह्यातील एकूण २१ हजार ५५ विद्यार्थ्यांना यावर्षी पदवी, पदविका प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यामध्ये १८० विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रमाणपत्र दीक्षान्त समारंभाच्या दुपारच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी, पदविका गृहन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पांढरा पायजमा, पँट व पांढरा बुशशर्ट आणि विद्यार्थिनींनी पांढरी साडी व पांढरा ब्लाउज किंवा पांढऱ्या रंगाच्या ओढनिसह पांढरा पंजाबी ड्रेस परिधान करावा.

ज्या विद्यार्थ्यांनी आप-आपल्या महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ पार पडल्यानंतर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या पदवी वितरण कार्यक्रमाध्ये पदवी प्रम ाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत.

# पोलीस पाटलांनी नि:पक्ष कामे करावीत –खा.अशोकराव चव्हाण



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– गावात कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व गावात सामाजिक एकोपा करण्यासाठी पोलिस पाटील महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे पोलीस पाटील यांनी गावात नि:पक्ष काम करावत, असे आवाहन खा.अशोकराव चव्हाण यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कामगार पोलीस पाटील संघाच्या वतीने २४ जानेवारी रोजी ओम गार्डन जुना कौठा येथे कार्यशाळा घेण्यात आली. संस्थापक अध्यक्ष भिकाजी पाटील, राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी नांदेड परिक्षेत्राचे विशेष उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, तर आ. ॲड.श्रीजया चव्हाण, पुनम पवार व राज्यभरातील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना खा. चव्हाण यांनी पोलीस पाटील यांच्या मानधना सोबत, कायद्याचा अभ्यास, तसेच तालुका स्तरावर पोलीस प्रशासनाने दर महिन्याला कार्यशाळा घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादीत केले. प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत पोलीस पाटलासाठी एक कक्ष देण्यात यावा, यासाठी गृहमंत्र्यांकडे आपण मागणी करणार असल्याचे ते म्हणाले.

आ.श्रीजया चव्हाण यांनी पोलीस पाटील पदावर पन्नास टक्के महिलांना संधी मिळाल्याचे सांगून पोलीस पाटील महिला यांनी स्वतःहून कार्यरत राहावे, पोलीस पाटलांच्या मागण्यांसाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा अध्यक्ष भास्कर कंकाळ पाटील यांनी प्रास्ताविक केले. नांदेड परिक्षेत्राचे उपम हानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटील यांना कायदे विषयक व सविस्तर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात सहकार क्षेत्रातील मान्यवरांनीही पोलीस पाटील यांना मार्गदर्शन केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी स्वागत अध्यक्ष भास्कर शंकरराव कंकाळ पाटील, संभाजी हणमंत राव पाटील मंडगीकर, जिल्हास्तरीय प्रमुख कमिटी, जिल्ह्यातील माजी पोलीस पाटील, नांदेड जिल्ह्यातील विविध तालुका अध्यक्ष, महिला पोलिस पाटील आघाडी व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शिवा संघटनेच्या वर्धापनदिनानिमित्त वीरशैव-लिंगायत व बहुजनांचा बसवकल्याण येथे आज मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिवा अखिल भारतीय वीरशैव-लिंगायत युवक संघटनेचा ३० वा आणि सेवा जनशक्ती पार्टीच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त बसवकल्याण (कर्नाटक) येथे दि. २८ जानेवारी रोजी वीरशैव-लिंगायत व बहुजनांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वरअण्णा खंड्रे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दुपारी १२-३० वाजता सुरु होणाऱ्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि सेवा जनशक्ती पार्टी पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून बसवकल्याणचे आमदार शरणु सलगर, संयोजक राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ताभाऊ खंकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेटे, राष्ट्रीय उपाध्यक्ष अभय कल्लावार, राष्ट्रीय उपाध्यक्ष माजी आ. शिवशरणअण्णा बिराजदार, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. वाय.बी. सोनटक्के, महाराष्ट्र उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, महाराष्ट्र सरचिटणीस धन्यकुमार शिवनकर, प्रदेश प्रवक्ते विठ्ठल ताकबिडे, सोशल मीडिया महाराष्ट्र अध्यक्ष मनीष पंधाडे, राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, पश्चिम कर्नाटक संपर्कप्रमुख प्रा. परमेश्वर आरबळे, महाराष्ट्र उपाध्यक्ष शैलेष जकापुरे, महाराष्ट्र सरचिटणीस रूपेश होणराव, महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील वाडकर, राज्य उपाध्यक्ष संतोष शेटकार, राज्य उपाध्यक्ष अरूण लद्दे, राज्य उपाध्यक्ष भीमापा खांदे, राज्य चिटणीस प्रा. किशरआप्पा इमडे, राज्य मुख्य संघटक नारायण कंकणवाडी, राज्य चिटणीस सातलिंग स्वामी, प्रांत सदस्य बालाजी बंडे, मराठवाडा प्रमुख अर्जुन सैदाने, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अरविंद भडोळे पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल कोठुळे, नवी मुंबई कोकण विभाग अध्यक्ष उद्धव खराडे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. देवानंद बोंते, पूर्व विदर्भ अध्यक्ष गजानन बाजारे, मराठवाडा अध्यक्ष वीरभद्र बसापुरे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष विलासअप्पा मोदे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरम कर, उदगीरचे वीरशैव समाजनेते चंद्रकांतअण्णा वैजापुरे, भक्तीस्थळ ट्रस्टचे अध्यक्ष कीर्तनकेसरी भगवंतराव पाटील चांभरगेकर, शिवा राष्ट्रीय भूषण कीर्तनकार शि.भ.प. मन्म थअप्पा डांगे, शिवा राष्ट्रीय भूषण कीर्तनकार शि.भ.प. शिवशरण रटकलकर हे उपस्थित राहणार आहेत.

# गंजगाव-कुंडलवाडी रस्त्यावरील पुल व खड्डयांची दुरूस्ती करण्याची मागणी

**बिलोली (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कार्ला, गंजगाव मार्गे कुंडलवाडी रस्त्यावर कुंडलवाडी शहरातील स्मशानात भुमी जवळील खड्डा व कोटग्याळ येथील नाल्यावर पुलाचे बांधकाम करावे, अन्यथा आमरण उपोषण सुरु करण्यात येईल, असा इशारा विद्यार्थी पालक व गंजगावच्या सरपंचांनी एका निवेदनाद्वारे प्रशासनास दिला आहे.

सीमावर्ती भागात असलेल्या कार्ला, गंजगाव, माचणूर, कोटग्याळ ते कुंडलवाडी या मार्गावरील कोटग्याळ येथील नाल्यावर पुल नसल्याने व याच मार्गावरील कुंडलवाडी शहरातील स्मशानात भुमी जवळ ४० ते ५० मिटरचा मोठा व रूंद खड्डा पडला आहे. मानव्य विकास अंतर्गत चालणारी बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे गंजगाव, माचणूर, कोटग्याळ यासह जवळ पासच्या गावातून बिलोली, अर्जापुर व कुंडलवाडी येथे शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

खराब रस्त्यामुळे विद्यार्थी व ग्रामस्थांची होणारी गैरसोय पाहता प्रशासनाने या रस्त्याची तत्काळ दुरूस्ती करावी अन्यथा या भागातील विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांसह याच मार्गावर आम रण उपोषण करण्याचा इशारा गंजगावच्या सरपंच सौ. सुनिता कनशेट्टे यांनी एका निवेदनाद्वारे तहसील प्रशासनास दिला आहे.




**नांदेड** : दक्षिणचे आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांनी भाजपचे चैतन्यबापू देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा देशमुख परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी देशमुख कुटूंबीय. (छाया : करणसिंह बैस)

# पात्र नवमतदारांनी उत्साहाने मतदार यादीत नावे नोंदवावी –कुलगुरू डॉ. मनोहर चासकर



**नांदेड (प्रतिनिधी)** – ज्या तरुण-तरुणींनी १ जानेवारी २०२५ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांनी अत्यंत उत्साहाने आपली नावे मतदार यादीत नोंदवावी. तसेच आपल्या मित्रांना सुध्दा मतदार यादीत नावे नोंदविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय म तदार दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वरकड, निवडणूक नायब तहसिलदार नितेशकुमार बोलोलू, नायब तहसीलदार इंद्रनील गरड यांच्यासह जिल्ह्यातील बीएलओंची उपस्थिती होती.

कुलगुरु डॉ. मनोहर चासकर म्हणाले की, सशक्त लोकशाही ही मतदार व मतदान या दोन बाबींवरच अवलंबून असते. तसेच मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे हक्क आहे. मतदार होऊन मतदान करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रथमच मतदार यादीत ज्यांची नावे समाविष्ट झाली आहेत असे नवमतदार कु.सुरभी नितेशकुमार बोलोलू, कु.रिया खडके, दिव्यांग मतदार शिवराज गणेशराव गिरडे, सौरभ गिरडे, पवन गिरडे यांना कुलगुरू डॉ चासकर यांनी निवडणूक कार्ड देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. सचिन खल्लाळ यांनी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करायचा यामागचा उद्देश म्हणजे नवमतदार वाढले पाहिजेत अशा शब्दात त्यांनी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी सांगितली. राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील बि.एल.ओ., पर्यवेक्षक, ग्राम महसूल अधिकारी, समन्वयक व अंगणवाडी ताईंचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश कुलकर्णी यांनी केले तर आभार तहसीलदार संजय वरकड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस.व्हि.भालके, जमील, मकरंद भालेराव, बी.एस.पांडे, घडलिंगे, भुसेवार, मोहम्मद आखीब, शेख अजहर यांनी विशेष परिश्रम घेतले.

प्रारंभी कुलगुरू डॉ. चासकर यांनी मतदाराची पुढील प्रतिज्ञा दिली. आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, सम ाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु.

# चांगले भविष्य घडविण्यासाठी ध्येय निश्चित करावे –आ. भीमराव केराम



**नांदेड (प्रतिनिधी)** – अभिनव भारत शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना सकारात्मक प्रेरणा देते. विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडण्यासाठी ध्येय निश्चित करून वाटचाल करावी आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करावेत, असे प्रतिपादन आ. भीमराव केराम यांनी केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या वतीने आयोजित विद्यार्थी वार्षिक महोत्सवाच्या बक्षीस वितरण प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अभिनव संस्थेचे कोषाध्यक्ष कैलासचंद्र काला, तर प्रमुख पाहुणे म्हणून, संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रवीण साले, विजय येवणकर, संस्थेचे सदस्य, गजाननराव कुलकर्णी, प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, विद्यार्थी वार्षिक महोत्सवाचे प्रभारी डॉ. जीवन मसुरे उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, डॉ. अर्चना भवानकर, पर्यवेक्षक डॉ. गोपाळ कृष्ण सांगवीकर, डॉ. कमलाकर बाराळीकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्र कुमार यांनी प्रास्ताविक केले, आपल्या प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल व महाविद्यालयाची यशोगाथा विशद केली.

भाजपाचे महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजूरकर म्हणाले की, अभिनव भारत शिक्षण संस्था ही विशिष्ट विचाराने प्रेरित असणारी शिक्षण संस्था आहे. अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे म्हणाले की, या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठ युवक महोत्सवात नावलौकिक मिळवला आहे. पुढे बोलतांना महाविद्यालयाच्या विद्यार्थी शिवराज मुधोळ हा त्याच्या मेहंदीसाठी आज अमेरिकेमध्ये मेहंदी काढण्यासाठी गेला आहे असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी सामाजिक भान जपले पाहिजे असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कैलासचंद काला यांनी महाविद्यालय स्तरावर आयोजित केलेल्या वेगवेगळ्या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा नावलौकिक केलेल्या सर्व विद्यार्थ्यांसह वार्षिक महोत्सवात आयोजित केलेल्या वेगवेगळ्या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना म ान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. संदीप काळे यांनी केले. तर आभार विद्यार्थी वार्षिक महोत्सव प्रभारी डॉ. जीवन मसुरे यांनी मानले.

या कार्यक्रमास म हाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. मनीष देशपांडे व डॉ. सौ. मीनाक्षी बांगर यांचा शिक्षण क्षेत्रांत केलेल्या अतुलनीय कार्या बद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम ास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते विजेत्या ग्रामपंचायतींचा सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)** – संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत विजेत्या ग्राम पंचायतींचा सन्मान जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आला. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित पोलिस मुख्यालयावरील मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात या विजेत्या ग्राम पंचायतींना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आला.

कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद तिडके, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर तसेच जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

सन २०२३–२४ या वर्षासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातंर्गत जिल्हास्तरीय तपासणीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम विजेत्या ग्राम पंचायतींमध्ये नागापूर (ता. भोकर) ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला. जवळगाव (ता. हिमायतनगर) ग्राम पंचायतीने व्दितीय क्रमांक, तर चिचोंली प.क. (ता. कंधार) ग्रामपंचायतीने तृतीय क्रमांक पटकावला. या विजेत्या ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक यांचा पालकमंत्री ना. अतुल सावे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पालकमंत्री ना. अतुल सावे यांनी ग्रामपंचायतींनी राबवलेल्या स्वच्छता उपक्रमांचे कौतुक केले.

# आ.चिखलीकर यांच्या उपस्थितीत लोहा सार्वजनिक शिवजयंती मंडळाची नुतन कार्यकारिणी जाहीर



**लोहा (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे यंदाही लोहा शहरात महाराष्ट्राचे आराध्य दैवत रयतेचे राजे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारी रोजी ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे. त्यासाठी सार्वजनिक शिवजयंतीची कार्यकारिणी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लोहा येथील व्यंकटेश गॉर्डन येथे जाहीर करण्यात आली.

लोहा येथील सार्वजनिक शिवजयंतीची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष पत्रकार केशव मुरलीधर पवार, स्वागताध्यक्ष –जीवन रामराव चव्हाण, उपाध्यक्ष –गणेश धनाजी कल्याणकार, सचिव – साईनाथ प्रल्हाद फाजगे, सहसचिव पपन बोडके, कोषाध्यक्ष – योगेश बंडू कदम, मिरवणूक प्रमुख – बालासाहेब पाटील कवठेकर, प्रसिद्धी प्रमुख – पत्रकार विलास सावळे, इमाम लदाफ, गोविंद कदम, रमेश पवार, शुभम उतरवार, सजावट प्रमुख – अनिल धुतमल, संयोजक – नगरसेवक भास्करराव पाटील पवार, मार्गदर्शक – माजी जि.प. सदस्य प्रविण पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, दत्ताभाऊ वाले, छत्रपती धुतमल, नारायण येलरवाड, दिपक पाटील कानवटे, पवार अशी जंबो कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

यावेळी सेवानिवृत्त कृषी अधिकारी माणिकराव मुकादम, जि.प. सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, मिलिंद पाटील पवार, बंडू पाटील वडजे, सुरेश गायकवाड, सचिन मुकदम अविनाश, पाटील पवार, आप्पाराव पवार, तुकाराम दाढेल, व्यंकट जंगले, बाळू पवार, बंटी देशमाने, ज्ञानेश्वर भिसे, शिवाजी पवार, सरपंच उध्दवराव पाटील सुर्यवंशी, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, दिनेश तेललवार, बाबुराव डोम, अर्जुन राठोड, अविनाश पाटील सुर्यवंशी, रमेश राठोड, नागनाथ चुडावकर आदी उपस्थित होते.

## नांदेड टेक्सटाईल्स मिल्स कर्मचारी प्लॉट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नांदेड विशेष सर्वसाधारण सभा नोटीस

नांदेड टेक्सटाईल्स मिल्स कर्मचारी प्लॉट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नांदेड या संस्थेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, मा.उपनिबंधक, सहकारी संस्था ता.जि.नांदेड यांचे पत्र दिनांक २२/१/२०२५ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार श्री.बी.बी.बोधगिरे, अवसायक तथा सहकार श्रेणी–१ संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे अध्यक्षतेखाली संस्थेच्या इमारतीतील श्री.डी.के.क्षिरसागर यांचा सदनिका नंबर १ नसरतपुर वाघी रोड नांदेड ता.जि.नांदेड येथे संस्थेचे पुनर्जिवन करणे बाबत विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १२/२/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सदर विशेष सर्वसाधारण सभेस संस्थेच्या सर्व सभासदांनी उपसिथत राहावे ही विनंती.

**(बी.बी.बोधगिरे)**
**नांदेड टेक्सटाईल्स मिल्स कर्मचारी प्लॉट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ६०३९/२०२५/क्षे.का.क्र.६ सिडको/२०२४ २०२५

प्रकरण :– नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सिडको मोढा सविता नामदेव वाघमारे रा.आंबेडकर चौक लातूर फाटा नांदेड ता.जि.नांदेड यांनी मौजे हडको अर्ज सादर केला आहे की, मनपा सिडको घर क्र.टाईप/ सेक्टर शेत सर्व्हे नंबर ४२ पैकी गट नंबर पैकी प्लॉट नंबर १८६ आहे येथील एकूण क्षे.४२.५० चौ.मी./चौ फुट ज्याची महानगरपालिका मालमत्ता क्र.११–१ पिन ४०५११११०३ नंबर आहे. श्री सिडको/कल्पना चंद्रकांत पांचाळा रा.अधारे नांदेड व यांचे नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत /विक्रीखत/बक्षीसपत्र सोसायटी कन्व्हेन्स डीड/ओनरशिप पद्धतीचे चुक दुरस्ती पत्र भाडेपट्याचे हस्तांतरणपत्र विक्रीखत/ दस्त क्र.७८१/२०१८ दिनांक १४/२/२०१८ अध व सिकडो ट्रान्सपर ऑर्डर दस्त क्र.CIDO/ ADM/AMO/NND/ २०१८/९६० दि.१२/२/२०१८ व लिंक दस्त क्र.३६७३/२०१५ दि.२४/५/२०१५ अधारे वसुधरा व्यंकटराव पाटील अधारे प्राप्त झालेल्या आहे.त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

चर्तुसिमा–पुर्वेस–,पश्चिमेस–विक्रीखत प्रमाणे, दक्षिणेस–,उत्तरेस–

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिय कार्यालय क्र.६सिडको**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

## Change In Name

My old name is VYANKAT UJLAPPA BHOGAJE which now I am changing as New Name VENKATRAO UJLAPPA BHOGAJE hence further my all correspondence will be done as per my new name please consider the same

ADD- AT.POST KARLA BK Tq.BILOLI Dist.NANDED 431710

## Change In Name

My Old Name is ABDUL GAFFUR which now I am changing as New Name ABDUL GAFOOR ABDUL RAHMAN Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

ADD- :H.N.9-2-275 BILAL NAGAR CHAUPALA ROAD ITWARA NANDED 431604 MO.9423438845

## Change In Name

My Old Name is SAFIA BEGUM which now I am changing as New Name SAFIYA BEGUM ABDUL GAFOOR Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.

ADD- :H.N.9-2-275 BILAL NAGAR CHAUPALA ROAD ITWARA NANDED 431604 MO.9423438845

# गोदावरीत विद्यार्थ्यांनी गिरवले स्वावलंबनाचे धडे



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गोदावरी इंटरनॅशनल पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व्यापारी जीवनाचा, व्यवहारी जीवनाचा अनुभव मिळावा, व्यवसायिक कौशल्य, व्यवहार ज्ञान, सहकार भावना, गणितातील संकल्पना, बेरीज–वजाबाकी आणि स्वावलंबनाचे धडे मिळावे यासाठी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते.

या आनंदनगरीत विविध खाद्यपदार्थांचे ७२ स्टॉल लावले होते.विद्यार्थ्यांना शालेय जीवनासोबत व्यवहारी जीवनामध्ये कसे वागावे नफा– तोटा या संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणाच्या माध्यमातून समजावून सांगणे तसेच एक चांगला व्यवसायिक होण्यासाठी काय करावे लागते या सर्व गोष्टींचा अनुभव देणे हा मानस ठेवून शाळेने हा उपक्रम राबवला होता. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी संचालक प्रा. पौळ, व्यवस्थापकीय संचालक आर. एस. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. होपळे, प्राचार्या डॉ. वैजयंती कस्तुरे, प्राचार्य नितीन हटकर, समन्वयक डी. जी. पाटील, पर्यवेक्षक नितीन बिरादार, प्रा.संदीप पावडे आदी उपस्थित होते.

या उपक्रमात एक हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत खरेदीचा आनंद लुटला.

# जिल्हा ग्रंथालय कार्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन नांदेड येथील सहाय्यक समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगिरे यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांना पुस्तक भेट देण्यात आली. जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

यावेळी बोलताना सहायक आयुक्त मिनगीरे यांनी मराठी भाषा संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे. मराठी भाषेचे जतन व्हावे, प्रचार प्रसिद्धी व्हावी, या उद्देशाने राज्यातील सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना मराठी भाषेचे ज्ञान राहील याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने शासन स्तरावर मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. त्यामुळे प्रत्येकाने यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. व्याख्याते नितीन कसबे यांनीही मराठी संवर्धनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रचालक केंद्र सूत्रसंचालन कैलास चंद्र गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महानगर वाचनालयाचे ग्रंथपाल श्रीनिवास इज्जपवार यांनी केले. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात झेंडावंदन



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ८ वा. झेंडावंदन करण्यात आले. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

पोलीस मैदानावरील मुख्य समारंभापूर्वी हे झेंडावंदन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# ‘यशवंत’मध्ये डॉ.आवटे यांचे व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)**– श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात ‘पीएम:उषा योजनेतील सॉफ्ट कंपोनंट ऍक्टिव्हिटी’ अंतर्गत दि.२८ जानेवारी रोजी सकाळी १०:३० वाजता ह्युमॅनिटीज स्मार्ट क्लासरूम येथे पत्रकार, स्तंभलेखक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील राज्यशास्त्र विषयाचे डॉ.श्रीरंजन आवटे यांचे ‘भारतीय संविधान: आपलं आयकार्ड’ या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## CONSULTING PHYSIOTHERAPIST
## कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट

डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)

- कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट)
- ड्राय नीडलींग थेरपीस्ट
- ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन
- टेपींग थेरपीस्ट
- न्यूरो रिहॅबिलिटेशन

उपलब्ध सुविधा

नांदेड

होम व्हिजीट उपलब्ध 9657631231


## Change In Name

My Old Name is SMITHA C which now I am changing as New Name SMITA SANJAY JAVALEKAR Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same. ADD- : SMITA SANJAY JAVALEKAR H.N.2-85-2 KABRA NAGAR RING ROAD OPP AMBIKA MANGAL KARALAY AMBIKA NAGAR NANDED 431601 MAHARASHTRA

MO.9423692769; 8356029892


ऑफर ऑफर A/C ऑफर

## महाराष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन

**फेशियल**
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

**डी–टॅन्**
१) O3+ 349/-
२) रागा 299/

**ब्लीच**
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

**कलर**
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

**हेयर स्पा**
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221



## पाहिजेत

घरकामासाठी २४ तास बाई पाहिजे
**संपर्क –विजया टप्पे भोकर**
**मो.९४२३१३९५२७**


## जाहीर प्रगटन

मौजे राहेर ता.नायगावं खै जि.नांदेड येथील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्री लिंगोजी रावसाहेब कदम रा.दुगाव ता.नायगांव खै जि.नांदेड यांनी अर्ज सादर करून मौजे राहेर येथील गट क्र. २२२ क्षेत्र २.८८ आर पैकी ०.५० आर शेत माझ्या मालकीचे असून जमिन माझ्याच ताब्यात आहे.७/१२ च्या इतर अधिकारामध्ये साधे कुळ मुकूंद झुनबा सा.कु.(१००१६) काबीज आहे (१००१६) मुकूंद झुनबा १९६१–६२ चा कुळ (१००१६) अशी नोंद झालेली आहे.सदर नाव कमी करून देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

तरी याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसाचे आत मा.तहसिलदार नायगावं खै यांच्याकडे सक्षम पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा.

अन्यथा विहीत मुदतीनंतर शासन नियमानुसार इतर अधिकारातील असलेली कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी

**तहसीलदार**
**नायगांव खै.**

## जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु) तालुका जिल्हा नांदेड हद्दीतील शेत गट नंबर ४१/ अ /१ मधील प्लॉट नंबर १७ साईज लांबी पुर्व पश्चिम १० मीटर व रूंदी दक्षिण उत्तर १० मीटर एकूण क्षेत्र.१०० चौरस मीटरचा प्लॉट जो गगन चंद्रशेखर लाभशेटवार रा.सोमेशकॉलनी नांदेड यांच्या नावावर असून तो प्लॉट नितेश नाथा वाघमारे रा.झेंडा चौक नांदेड यांचेकडून ज्ञानेदव नारायण ननुरे मु.येलूर पो.गोणार ता.कंधार जि.नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना काही रक्कम दिली आहे. प्लॉटची चतु:सीमा खालील प्रमाणे पूर्वेस प्लॉट नंबर १८ , पश्चिमेस –प्लॉट नंबर १६, दक्षिणेस ६ मीटर रूंद रोड, उत्तरेस– प्लॉट नंबर १२. तरी वरील चर्तुसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क,उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा.मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे कन्व्हेस डिड करून संस्थेस हस्तांतरण करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**ज्ञानदेव नारायण ननुरे**
**मु.येलूर पो.गोणार ता.कंधार जि.नांदेड**

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २५/२०२५ पु. ता. – ४/३/२०२५

अर्जदार–१.जया भ्र.साहेबराव बागेलवाड, वय ६० वर्षे, व्यवसाय–घरकाम ,रा. गुंडगावकर यांच्या घरासमोर गितानगर नांदेड ह.मु.बिलोली ता.बिलोली जि.नांदेड २.नितु भ्र.मनोज सुद्देवाड वय ४४ वर्षे धंदा घरकाम रा.व्यकटेश कृपा ज्ञानेश्वर मंदीराजवळ विद्यान–गर परभणी ता.जि.परभणी ३.सुजाता भ्र.भारत पेरगुलवार वय ४० वर्षे धंदा घराकम रा.घर क्र.१–१५–३३७ सरस्वती निवास गितानगर तरोडा बु.नांदेड

विरुध्द–

गैरअर्जदार–निरंक

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ व ३ हे मयत साहेबराव पि.गंगाराम बागेलवाड यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक १ ही मयत साहेबराव पि.गंगाराम बागेलवाड यांची पत्नी आहे.व अर्जदार २ व ३ ह्या मयत साहेबराव पि.गंगाराम बागेलवाड यांच्या मुली आहेत.मयत साहेबराव पि.गंगाराम बागेलवाड यांचा मृत्यू दिनांक २९/८/२०२४ रोजी झाला अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्र.१ ते ३ यांना मयत साहेबराव पि.गंगाराम बागेलवाड यांचे वारसा असल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी मा. न्यायालयात मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील सर्व अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर मयताचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दिनांक २४/१/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायाधीश क. स्तर उमरी यांच्या न्यायालयात,
समक्ष ए.बी.रेडकर दिवाणी न्यायाधीश क.स्तर उमरी
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४ /२०२५ लक्ष्मीबाई व इतर वि.निरंक

अर्जदार–लक्ष्मीबाई भ्र.गोविंद मंतलवाड वय ४२ वर्षे धंदा घरकाम २. प्रकाश गोविंद मंतलवाड वय २१ वर्षे धंदा शिक्षण.३ स्वरूपा उर्फे रूपाली गोविद मंतलवाड वय १८ वर्षे धंदा शिक्षण ४.कृष्णा पि.गोविंद मतंलवाड वय १६ वर्षे धंदा शिक्षण अर्जदार क्र. ४ अपाक आई लक्ष्मीबाई भ्र. गोविंद मंतलवाड ५.देवराव पि.गंगाधर मंतलवाड वय ६५ वर्षे धंदा शेती.६.कलावती भ्र.देवराव मंतलवाड वय ६२ वर्षे धंदा घराकम सर्व रा.बितनाळ ता.उमरी जि.नांदेड

विरुध्द –निरंक

दावा – बॉम्बे रेग्यूलेशन कायदा १८२७ कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मयत गोविद पि.देवदाव मंतलवाड यांचे दिनांक १७/६/२०२४ रोजी मौजे बितनाळ ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.सदरील जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत करणातील अर्जदार १ लक्ष्मीबाई भ्र.गोविंद मंतलवाड वय ४२ वर्षे धंदा घरकाम रा.बितनाळ ता.उमरी जि.नांदेड व इतर ५ हे मयताचे वारस असून त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत गोविद पि.देवदाव मंतलवाड यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्यूलेशन कायदा १८२७ कलम ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज त्यांचे वकील श्री.एस.बी. शिर्के यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरील प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की प्रस्तुत प्रकरणात वरील बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी या बाबतचे आपले म्हणणे सदरील जाहीर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासून विहीत मुदतीच्या आत दिनांक २८/२/२०२५ पर्यंत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकरणाचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरून नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.आज दिनांक २२/१/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून**

**वरिष्ठ लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय क.स्तर उमरी**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## आ.बोंढारकर यांनी दिली विष्णुपुरीच्या शासकीय रुग्णालयाला भेट

### स्वच्छतेसह अनेक विभागाचा घेतला आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी येथील डॉक्टर शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयास नांदेड दक्षिणचे आ.आनंदराव बोंढारकर यांनी सोमवारी भेट दिली. या भेटीत शासकीय रुग्णालयातील स्वच्छतेसह विविध सोयी सुविधांची त्यांनी पाहणी करून आढावाही घेतला.

याचवेळी नांदेड शहरातील श्री गुरुगोविंद सिंघजी शासकीय रुग्णालयातही आमदार बोंढारकर यांनी भेट देऊन आढावा घेतला. यावेळी डीन डॉ. सुधीर देशमुख, सिव्हिल सर्जन डॉ. निळकंठ भोसीकर, होमिफिलिया कॉर्डिनेटर लक्ष्मीकांत जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय आणि गुरुगोविंद सिंघजी शासकीय जिल्हा रुग्णालय नांदेड येथे आज आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांनी भेट दिली. या भेटीत त्यांनी रुग्णालयातील स्वच्छतेपासून ते रुग्णांच्या सोयी सुविधांपर्यंतची पाहणी केली. तसेच रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा विश्वास त्यांनी दिला. रुग्णांच्या सेवेसाठी बसविण्यात येणाऱ्या एम आरआय या मशीनच्या जागेची पाहणी करून रुग्णालयातील सर्व विभाग प्रमुखांशी संवाद साधला. गोरगरीब रुग्णांची सेवा करून ईश्वराची सेवा प्राप्त करून घेण्याची तुम्हाला मोठी संधी आहे. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांची सेवा योग्य रीतीने करा. प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार मिळाले पाहिजेत. त्यासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करू. मात्र शासकीय रुग्णालयात आलेला रुग्ण बरा होऊन घरी परतल्यानंतर शासकीय यंत्रणेबाबत तो सकारात्मक बोलला पाहिजे. शासकीय रुग्णालयावर जनतेचा विश्वास आला पाहिजे. यासाठी आपण उत्तमरित्या काम केले पाहिजे, अशी अपेक्षाही आ. बोंढारकर यांनी यावेळी व्यक्त केली. रुग्णालय परिसरात अस्वच्छता खपवून घेतली जाणार नाही. यासाठी स्वच्छतेवर अधिकाधिक लक्ष द्या, अशा सूचनाही आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी यावेळी दिल्या.



### रुग्णांची केली विचारपूस

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयास भेट आ. बोंढारकर यांनी सर्वच विभाग प्रमुखांची डीन डॉ. सुधीर देशमुख, अधिष्ठाता डॉ.निळकंठ भोसीकर यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. या बैठकीनंतर आ. बोंढारकर यांनी थेट वार्डात जाऊन रुग्णांची विचारपूस केली. योग्य उपचार मिळत आहेत का ? डॉक्टर आपल्याशी सौजन्याने वागत आहेत का? याची त्यांनी चौकशी करून समाधान व्यक्त केले.

## जिजाऊ ब्रिगेड वर्धापन दिनानिमीत्त हळदीकुंकू समारंभ संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिजाऊ ब्रिगेड वर्धापन दिनानिमित्त जिजाऊ ब्रिगेड टीम नांदेड तर्फे २६ रोजी सायंकाळी तिळगुळ स्नेहमिलन व हळदीकुंकू समारंभ गीतानगर येथील संस्कार इंग्लिश प्ले स्कूलमध्ये अतिशय उत्साहात पार पडला. एकलपालक असलेल्या महिलांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी एकलपालकांना सन्मानित करून एक चांगलं उदाहरण समाजासमोर दाखल केले.

कार्यक्रमाला हजारो महिलांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी महिलांना हळदीकुंकू लावून, तिळगुळ देऊन विविध महानायकांची चरित्र पुस्तके वाण म्हणून भेट देण्यात आले.

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने विविधतेत एकता दाखवणारी वेगवेगळ्या राज्यांची जिजाऊ ब्रिगेड महिलांनी केलेली वेशभूषा हे या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. या कार्यक्रमाला राजकीय, प्रशासकीय व विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांपासून तर सर्वसामान्य महिलांपर्यंत हजारो महिलांनी उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमाचे आयोजन नांदेड जिजाऊ ब्रिगेड टीमचे नांदेड दक्षिणच्या जिल्हाध्यक्षा सुमित्रा वडजकर व उत्तरच्या जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण, डॉ. भारती मढवई, डॉ. विद्या पाटील, अरुणा जाधव, मीनाक्षी पाटील, वनिता देवसरकर, अर्चना होगे, रत्नमाला जाधव, सोनाली देशमुख, सुनिता कल्याणकर, रेणुका कौसले, सुनिता बोंगाणे, सुरेखा रावणगावकर, राणी दळवी, कविता आगलावे, संतोषी पाटील, प्रिया इंगळे, अनुराधा खरगे, कीर्ती सुस्तरवार, निर्मला जाधव, शिवानी जाधव, शुभलक्ष्मी सूर्यवंशी, श्रद्धा कदम प्रज्ञा देशमुख यांनी केले.

## घातक शस्त्र बाळगणाऱ्या तिघांना अटक; ‘स्थागुशा’ची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने बिलोली तालुक्यातील चिंचाळा फाटा येथील तिघांना पकडून त्यांच्याकडून आठ तलवारी आणि खंजीर जप्त केले आहेत. तसेच त्यांची दुचाकी जप्त केली आहे.

दि. २५ जानेवारी रोजी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी पोलीस उपनिरिक्षक आनंद बिचेवार आणि त्यांचे सहकारी पोलीस अंमलदारांना पाहिजे आणि फरार असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी बिलोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रवाना केले. पथकाने चिंचाळा फाटा ता. बिलोली



येथे त्यांनी एका दुचाकीवरवर तीन जण पाहिले. त्या तिघांना थांबवले असतांना त्यांच्याकडे वेगवेगळ्या प्रकारच्या तलवारी, खंजरी असे घातक ८ शस्त्र सापडले. एकाच दुचाकीवर तिघे बसून जाणारी दुचाकी (टी.एस. १६ एफ.ई.६२९२) जप्त करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ६५ हजार ५०० रुपये आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक आनंद बिचेवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार बिलोली पोलीस ठाण्यात सुमंतसिंग जेलरसिंग ठाक (वय २४) रा. बोधन जि. निजामाबाद, संदीपसिंग दरबारसिंग बावरी (वय १९) रा. बोधन जि. निजामाबाद, संजुसिंग चरणसिंग ठाक (वय २४) रा. बोधन जि. निजामाबाद या तिघांविरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस अंमलदार शिंदे हे करत आहेत.

## लोहा तालुक्यातील गुराखीगडावर ज्ञानहंडी फोडून जागतिक गुराखी साहित्य संमेलनास सुरूवात

**लोहा (प्रतिनिधी)–** तालुक्यातील गुराखी गडावर माजी खासदार स्वातंत्र्य सेनानी डॉ केशवराव धोंडगे साहेब गुराखी साहित्य नगरीत दि.२६ जानेवारी रोजी ३० व्या जागतिक गुराखी साहित्य संमेलनाला ज्ञानहंडी फोडून २६ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात सुरूवात झाली.

सुप्रसिद्ध साहित्यिक तथा कवी देविदास फुलारी यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी संमेलनाध्यक्ष दत्ता देवकांबळे, स्वागताध्यक्ष डॉ.पुरुषोतम धोंडगे, प्रमुख पाहुणे यादवराव कोलंबकर, राघिणी देवकर, दिलीप चव्हाण, गुराखी पीठ कुलगुरू बायनाबाई पवार, माजी आमदार गुरुनाथ कुरुडे, माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड, प्राचार्य निवृत्ती कौशल्ये, डी.एस.बोधगीरे आदी मान्यवर उपस्थित होते.

तत्पूर्वी पायी दिंडी पदयात्रा कामाईच्या झऱ्यापासून शाळेतील विद्यार्थ्यांनी कंधार - लोहा रोड मार्गावरुन लेझीम, टाळ, मृदंगाच्या विविध वाद्यांच्या गजरात वेगवेगळ्या पोशाखात असलेले विद्यार्थी, समाजातील सर्व स्तरातील लोकांचे दर्शन घडून आले. गुराखी, सालदार, पोतराज, वासूदेव, बहुरूपी, बैलवाले, शाहीर, देवकर, राईंदर, फकीर, विविध नृत्यन करत लमाणी



गीताचे गायन लमाणी माता भगिनी, गोंधळी अशा असंख्य विविध ग्रामीण कलाकारांनी देखाव्यांसह सजून नटून-थटून मूळ कलागुणांना वाव देत पायी दिंडी पदयात्रा ३ कि.मी. अंतर कापून थेट गुराखी गडावर धडकली.

पायी दिंडी पदयात्रा आगमनानंतर प्रथमतः गुराखी ध्वजारोहन जागतिक गुराखी राजांच्या हस्ते संपन्न झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ज्ञानहंडी फोडून संमेलनाला प्रारंभ झाला.

प्रा. डॉ. पुरूषोत्तम धोंडगे यांनी प्रास्ताविक केले. ते म्हणाले की, डॉ. भाई केशवराव धोंडगे यांच्या संकल्पनेतून गेली २९ वर्षापासून जागतिक गुराखी साहित्य संमेलन भरविले जाते. संमेलनात नाहीरे वाले, कुणबी राजे सरदार राजे गुराखी कलावंतांना आपल्या कला गुण गुराखी पिठावर सादर करण्यासाठीचे हक्काचे व्यासपीठ म्हणून जागतिक गुराखी साहित्य संमेलनात उपलब्ध झालेले आहे. त्यांच्या पश्चात केशवराव धोंडगे यांची उणीव आपण कदापि भरून काढू शकत नाही तरी त्यांच्या सर्वच परंपरा जोपासण्याचा प्रयत्न करण्याचा दृढनिश्चय व्यक्त केला. व्यासपीठावरील सर्वांचे आभार मानले. या संमेलनाचा २८ रोजी समारोप होणार आहे.

## निवृत्त डीवायएसपी व त्यांच्या पत्नीविरुद्ध भाग्यनगर ठाण्यात ‘एसीबी’चा गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक यांनी उत्पन्नाच्या तुलनेत १६.६५ टक्के अपसंपदा जमवली. याप्रकरणी त्यांच्या विरुद्ध भाग्यनगर पोलीस ठाण्यात अफसंपदाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक संजय पुजलवार यांची लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई या कार्यालयाच्या तक्रारीवरून उघड चौकशी करण्यात आली. या चौकशीदरम्यान संजय पुजलवार आणि त्यांच्या पत्नी मनिषा पुजलवार रा. आमदारनगर, मालेगाव रोड नांदेड यांच्याकडे १ मे १९९८ ते ३१ मार्च २०१९ या २१ वर्षाच्या कालखंडात त्यांच्याकडे अपेक्षीत कायदेशीर उत्पन्नाच्या स्त्रोतांप्रमाणे जेवढी संपत्ती असावी त्यापेक्षा २८ लाख ७४ हजार १४६ रुपयांची जास्त मालमत्ता सापडली.

यानुसार मुंबई येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक संतोश गुर्जर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड येथे अपसंपदेसाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम १३ (१) (ब), १३(२) आणि १२ नुसार पोलीस ठाणे भाग्यनगर येथे गुन्हा क्रमांक ५९/२०२५ दाखल करण्यात आला आहे. नांदेड येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधिक्षक संदीप पालवे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. संजय तुंगार, पोलीस उपअधिक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर अधिक तपास करीत आहेत.

## लोहा-कंधार-बाचोटी-गडगा नरसी रस्त्यासाठी निधी द्या

### आ. चिखलीकर यांची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** परळी ते निजामाबाद या रस्त्याला लोहा-कंधार-बाचोटी-बारुळ-कौठा-गदगा आणि नरसी या मार्गाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

परळी ते निजामाबाद रस्ता (भाग- लोहा - कंधार - बाचोटी-बारुळ - कौठा - गडगा- नरसी ) रस्ता जोडण्यासाठी कंधार तालुक्यातील अनेक दिवसापासून मागणी घेऊन



कंधार कृ.उ.बा.स.चे सभापती संजय देशमुख कौठेकर, बारुळचे सरपंच शंकरराव नाईक, पांडुरंग पा. कौसल्ये, आनंदराव धोंडगे, चौकीधर्मापुरीचे माजी सरपंच बालाजी मेकलवाड, उध्दव पाटील वळसंगवाडी, तेलुरचे माजी सरपंच बालाजी पा.बस्वदे, चेरअरमन मारोतराव कउटकर यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याकडे रस्ता मंजुर करण्याची मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे हा रस्ता मंजुर करण्याची मागणी केली. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सदर रस्ता तात्काळ मंजुर करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे कंधार - लोहा भागातील नागरिकांची मागणी लवकरच पूर्ण होणार असल्याचा विश्वास आ. चिखलीकर यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ. प्रणितातार्इ देवरे - चिखलीकर यांची उपस्थिती होती.

## विठ्ठाबाई सुंकवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बहादरपुरा (ता.कंधार हा. मु. टिळक नगर, नांदेड) येथील ज्येष्ठ महिला श्रीमती विठ्ठाबाई गंगाराम सुंकवाड (वय ८५) यांचे दि.२६ रोजी निधन झाले.



त्यांच्यावर २७ रोजी दुपारी गोवर्धनघाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. निवृत्त गटविकास अधिकारी बालाजी सुंकवाड व जिल्हा उपनिबंधक हिंगोली येथील संजय सुंकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

## साहेबराव हौसरे यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान



**मुदखेड (प्रतिनिधी)–** सामाजिक शैक्षणिक साहित्य सांस्कृतिक आदी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल येथील दैनिक गोदातीर समाचारचे ज्येष्ठ पत्रकार साहेबराव हौसरे यांनी उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार देण्यात आला आहे.

मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठानच्या उमरी यांच्या वतीने २७ जानेवारी रोजी जनसंवाद राज्य स्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन घेण्यात आले. याच कार्यक्रमात उत्कृष्ट पत्रकारिता २०२५ चा पुरस्कार सोहळा पार पडला. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते साहेबराव हौसारे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी संमेलनाचे अध्यक्ष डॉ जगदीश कदम हे होते. स्वागत अध्यक्ष प्रवीण गायकवाड, निमंत्रक प्राध्यापक प्रल्हाद इंगोले, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, संचालक गोविंदराव शिंदे, शंकर राठी, नागोराव डोंगर यांची उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल साहेबराव हौसारे यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## एसटी दरवाढीविरोधात शिवसेना ठाकरे गटाचे बसस्थानकात चक्काजाम

**नांदेड (प्रतिनिधी) –** राज्य सरकारने एसटी महामंडळ तोट्यात गेल्याने प्रवासी दरवाढ केली आहे. या दरवाढीच्या विरोधात उबाठा शिवसेनेच्या वतीने सोमवारी जिल्ह्याभरात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. तर शहरात मध्यवर्ती बसस्थानकात सकाळी हे आंदोलन झाले.

दररोज हजारो प्रवासी एसटीच्या प्रवासालाच प्राधान्य देतात. परंतू राज्य सरकारने नुकतेच घेतलेल्या निर्णयामुळे एसटीचा प्रवास महागला आहे. या दरवाढीच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने सोमवारी जिल्हाभर आंदोलन करण्यात आले आहे. तर शहरातील मध्यवर्ती बसस्थानकात सकाळी सेनेच्या पदाधिकारी,



कार्यकर्त्यांनी चक्का जाम आंदोलन केले. यावेळी घोषणाबाजी करीत कार्यकर्त्यांनी शासनाचा निषेध केला. यावेळी जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे म्हणाले की, या राज्याचे जे परिवहन मंत्री आहेत, त्यांनाच एसटीची दरवाढ झाली हे माहित नाही. याचे आश्चर्य वाटते. राज्याचे मुख्यमंत्री एकटेच कारभार चालवित असून एकतर्फी निर्णय घेत आहेत, हे यातून दिसून येत आहे. ही दरवाढ रद्द करावी अशी मागणी केली. या आंदोलनामुळे काही वेळ बसस्थानकात एसटी बसेस आणि शेकडो प्रवासी अडकून पडले होते. या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख व्यंकोबा येडे, विजय बगाटे, माजी सभापती नरहरी वाघ यांच्यासह शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

### अर्धापूर येथील बसस्थानक परिसरात जोरदार

अर्धापूर येथील बसस्थानकावर घोषणाबाजी करत राज्य शासनाच्या विरोधात संतप्त शिवसैनिकांनी चक्काजाम आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी काहीवेळ अनेक बसेस बसस्थानकात थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. शेवटी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर, शहरप्रमुख काजी सल्लाउद्दीन, उपसभापती अशोकराव कपाटे, रमेश पाटील क्षीरसागर, अशोकराव डांगे, सुनील बोबडे, नागेश पाटील सरोळे, अमोल वारसे, दिपक कदम, गजानन गव्हाणे, भगवान पवार, एकनाथ मोगरकर, शेख रफीक आदी उपस्थित होते.

## निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांना नां.ए.सो.ची श्रद्धांजली

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती, नांदेड येथील नांदेड येथील कै. नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानचे न्यास करते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष नरेंद्र चपळगावकर यांचे नुकतेच निधन झाले. नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी डॉ.व्यंकटेश काब्दे म्हणाले की, नरेंद्र चपळगावकर हे मराठवाड्याच्या विचारवंतांच्या परंपरेतील ते एक महत्त्वाचा दुवा होते. त्यांनी ललित लेखनापासून सुरुवात करून वैचारिक असे महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यावेळेस बोलताना दीपनाथ पत्की यांनी नरेंद्र चपळगावकर यांच्यामुळेच नरहर कुरुंदकर प्रतिष्ठान साकारल्याचे भावना व्यक्त केली. तर उपाध्यक्ष प्रवीण पाटील यांनी संस्थेच्या अडचणीच्या काळात चपळगावकरांचे मौलिक मार्गदर्शन लाभल्याचे सांगितले. सचिव प्रा. शामल पत्की आणि सहसचिव ॲड. प्रफुल्ल अग्रवाल यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. या श्रद्धांजली सभेस प्राचार्य डॉ. आर. एम. जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे, प्रा. डॉ.यशपाल भिंगे, प्रा. डॉ. ए. टी. शिंदे, प्रा. विलास वडजे, प्रा. डॉ. मनेश्वर, उपप्राचार्य डॉ. ए. एन. सिद्धेवाड, उपप्राचार्य डॉ. सचिन पवार उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com